# बृहन्मुंबई महानगरपालिका

सहाय्यक उद्यान अधीक्षक यांचे कार्यालय, एफ/दक्षिण विभाग इमारत, रू. क्र. ३२ बी. डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, परेल, मुंबई – ४०००१२

क्र. एफ एस / ०००९०१ / स. उ. अ. दि 18/04/2023

प्रति,
म्हात्रे एण्ड असोसिएट्स,
आर्किटेक्ट इंजिनियर्स एण्ड डिझायनर्स
१/१६१, साई कृपा,
रोड क्र.१०,यु. आय. सि. टी. जवळ
वडाळा (प), मुंबई – ४०००३१

विषय:- सुपारीबाग इस्टेट, परमार गुरुजी मार्ग,परेल येथील आवारातील बांधकामात अडथळा करणाऱ्या झाडांच्या फांद्या छाटण्याकरीता परवानगी मिळणेबाबत

संदर्भ :- १. आपले दि. ११.०४.२०२३ रोजीचे पत्र

महोदय / महोदया,

कृपया उपरोक्त विषयासंदर्भातील आपले दि. ०३.०९.२०२१ रोजीचे पत्र पहावे. त्यानुसार आपणास कळविण्यात येते की, सदर अर्जात नमूद न. भू. क्र. ९३/७४ (भाग) (प्लॉट क्र.१४७)(भाग) न.भू.क्र. ९६/७४ (भाग) (प्लॉट क्र. १३८ भाग),न.भू. ८८/७४ (भाग) आणि न.भू.क्र. ९७/७४ (प्लोट क्र.१३७ भाग) परेल शिवडी डिव्हीजन, सुपारी बाग इस्टेट, स्कीम नं.,३१,परमार गुरूजी मार्ग, परेल, येथील आवारातील बांधकामात अडथळा करणाऱ्या झाडांच्या फांद्या छाटण्याकरीता पुढील अटीसापेक्ष परवानगी देण्यात येत आहे.

अटी : 1. झाडांच्या मालकाच्या ना हरकत प्रमाणपत्र व आपल्या जोखमीवर व स्वखर्चाने दिलेल्या परवानगीनुसार काम करण्यात यावे.

2. महानगरपालिकेच्या कार्यालयात कार्यरत असणारे उद्यान विद्या सहाय्यक / कनिष्ठ वृक्ष अधिकारी यांना पूर्वसूचना देऊन दिलेल्या परवानगीनुसार काम करण्यात यावे.

3.वृक्षछाटणीद्वारे निर्माण होणा-या फांद्या व अन्य कच-याची विल्हेवाट बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीबाहेर स्वखर्चाने लावण्यात यावी. सदर फांद्या अथवा कचरा पदपथावर अथवा महानगरपालिकेच्या अन्य जागी टाकल्यास आपणावर दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

४ सदर वृक्ष छाटणी परवानगी निर्गमीत दिनांकापासून ६ महिने वैध राहील.

परवानगी दिलेल्या फांद्यांचा तपशील –

| अनु. क्र. | झाडाचे नाव व क्र. | झाडांची संख्या | झाडाचा घेर (फूट) | झाडाची उंची (फुट) | फांद्यांची संख्या | फांद्यांची लांबी (फुट) अंदाजे | फांद्यांची रुंदी (फुट) अंदाजे | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | रबर | ०१ | ३ | ३० | १ | १५ | १०" - ११" | सदर झाड परमार गुरूजी पदपथावरील असून सदर झाडांची अहवालात नमूद फांदी Pilling च्या कामात अडथळा ठरत असल्याने नमूद फांदी कापून झाडाचा भार समतोल करण्यात यावा. |
| २ | पिंपळ | ०१ | ७ | ३५ | १ | १५ | १०" | सदर झाड हे दक्षिणेकडील संरक्षक भिंतीलगत वाढलेले असून सदर झाडाच्या अहवालात नमूद फांद्या Pilling च्या कामात अडथळा ठरत असल्याने नमूद फांदी कापून झाडाचा भार समतोल करण्यात यावा. |
| | | | | | १ | १५ | १.५ | |

18/04/2023

**सहाय्यक उद्यान अधिक्षक एफ / दक्षिण**